नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे / Year - 4rd | अंक - ९५ / Issue - 95 | वार - शनिवार दि. २९ ऑगस्ट २०२६ / Blow- Saturday Date 29 AUGUST 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com / वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ / Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये / Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 / ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# विध्वंसक जलप्रलयाने ५७९ जणांचा करुण अंत; १९२४ अद्याप बेपत्ता

## हिमनद्यांचे कडे कोसळल्याने घडली दुर्घटना; नेपाळला पुन्हा महापुराचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वृत्तसंस्था, काठमांडू: नेपाळ-तिबेट सीमेवरील विध्वंसक जलप्रलयाने हाहाकार माजवला असताना नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती धोका व्यवस्थापन प्राधिकरणाने (एनडीआरआरएमए) पुन्हा महापुराचा इशारा दिला. नेपाळमधील ५७९ आणि तिबेटमधील पाच मृतांसह प्रलयबळींची संख्या शुक्रवारी ५८४वर पोहोचली असून, १९२४ जण अद्याप बेपत्ता आहेत.

हिमनद्यांचे कडे कोसळून मध्य नेपाळच्या रसुवा आणि अन्य भागांसह तिबेटमध्ये बुधवारी आलेल्या जलप्रलयामुळे झालेल्या विध्वंसानंतर शुक्रवारी बचावकार्याला आणखी गती मिळाली. अनेक शहरे, गावे, रस्ते, पूल, जलविद्युत प्रकल्पांना जलप्रलयाचा तडाखा बसला आहे. या प्रलयामुळे नेपाळमध्ये सुमारे एक हजार जण, तर तिबेटमध्ये ५५८ जण बेपत्ता आहेत.

विध्वंसक जलप्रलयामुळे अनेक ठिकाणी जलपातळी वाढली असून, तिथे पुन्हा महापुराचा धोका आहे.'बुधवारी ज्या ठिकाणी अचानक पूर आला होता, त्याच ठिकाणी चिखलमिश्रित पाण्याची पातळी वाढली आहे आणि त्या परिसरात आणखी पूर येण्याचा धोका आहे,' असे एनडीआरआरएमएने म्हटले. तिबेटकडील एक धरण फुटल्याचा दाखल देऊन नेपाळ पोलिसांनीही दक्षतेचा इशारा दिला आहे.



कोचेन खोला आणि पुरेपू या नद्यांच्या संगमावर नेपाळमध्ये मोठे तलाव तयार झाले आहेत. या तलावात सुमारे दोन दशलक्ष घटमीटर पाणी साचले असून, येत्या काही दिवसांत या पाण्यात भर पडणार असल्याने ते फुटण्याची भीती चीनने वर्तवली आहे.

जलप्रलयामुळे तिबेटमध्ये पाच जणांचा मृत्यू झाला असून, ५५८ जण बेपत्ता आहेत. त्यात २६० परदेशी पर्यटक असल्याचे चीनकडून शुक्रवारी सांगण्यात आले. मात्र, ते कोणत्या देशाचे आहेत, हे अद्याप चीनने जाहीर केलेले नाही.

बीजिंग : नेपाळमध्ये उंच पवर्तीय हिमकडा कोसळल्याने जलप्रलय आल्याचे चीनने म्हटले आहे. 'या आपत्तीच्या कारणांबाबत चीन आणि नेपाळमधील सरकारी संस्था, तज्ज्ञांच्या निरीक्षणांची नोंद आम्ही केली आहे. नेपाळमधील उंचावरील हिमकडा कोसळल्याने हे संकट निर्माण झाल्याचे त्यांचे विश्लेषण ग्राह्य धरले आहे', असे चीनचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी सांगितले.

बीजिंग: चीनचे अध्यक्ष शि जिनपिंग यांनी शुक्रवारी बैठक घेऊन तिबेटमधील जलप्रलयानंतरच्या स्थितीचा आढावा घेतला. बचावकार्याला वेग देण्याबरोबरच बेपत्ता असलेल्या चिनी आणि परदेशी नागरिकांच्या शोधासाठी प्रयत्नांची शिकस्त करण्याची सूचना जिनपिंग यांनी बचावपथकांना दिली.

# कोल्हापुरात पोलिसांची मोठी कारवाई; कुख्यात बिश्नोई टोळीचा म्होरक्या आणि साथीदाराला फिल्मीस्टाइल अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर: कोल्हापूर जिल्हा पोलिसांनी आंतरराज्यीय संघटित गुन्हेगारी टोळीविरुद्ध एक अत्यंत धाडसी आणि मोठी कारवाई केली आहे. कुख्यात बिश्नोई ००७ गँगचा म्होरक्या शामलाल गोवर्धनराम पुनिया (उर्फ बिश्नोई) आणि त्याचा प्रमुख साथीदार श्रीराम मंजू उर्फ पाचाराम बिश्नोई यांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने कोल्हापूर जिल्हा व सत्र न्यायालयाच्या परिसरातून शिताफीने ताब्यात घेतले. या कारवाईमुळे गुन्हेगारी विश्वात मोठी खळबळ उडाली असून, राजस्थान आणि महाराष्ट्र पोलिसांच्या रडारवर असलेल्या या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात कोल्हापूर पोलिसांना यश आले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, हे दोन्ही आरोपी गंभीर गुन्ह्यांमध्ये फरार होते आणि ते कोल्हापूर न्यायालय परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण आणि त्यांच्या पथकाने न्यायालय परिसरात सापळा रचला होता. दुपारी साडेबाराच्या सुमारास आरोपींनी पांढऱ्या रंगाच्या कारमधून पार्किंगच्या जागेतून बाहेर पडत असताना पोलिसांची चाहुल लागताच पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी प्रसंगावधान राखून न्यायालयाचे मुख्य गेट बंद केले आणि त्यांचा मार्ग रोखून धरला, ज्यामुळे त्यांना पळून जाणे अशक्य झाले आणि पोलिसांनी दोघांनाही जेरबंद केले.

अटकेत असलेला म्होरक्या शाम लाल पुनिया हा मूळचा राजस्थानमधील असून त्याच्यावर हत्या, हत्येचा प्रयत्न, दरोडा आणि बेकायदेशीर शस्त्रे बाळगणे यांसारखे एकूण १७ गंभीर गुन्हे दाखल आहेत. विशेष म्हणजे, २०२० मध्ये कोल्हापुरातील किणी टोल नाका येथे त्याने पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला होता, त्यावेळी तत्कालीन पोलीस निरीक्षक तानाजी सावंत यांनी प्रतिहल्ला करून त्याला ताब्यात घेतले होते. दुसरा आरोपी श्रीराम मंजू (वय २९) याच्यावर राजस्थान आणि महाराष्ट्रात मिळून एकूण २६ गुन्हे दाखल आहेत. यामध्ये बलात्कार, विनयभंग, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी आणि घरफोडी यांसारख्या अत्यंत गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. हे दोन्ही आरोपी पिंपरी-चिंचवड आणि राजस्थान पोलिसांच्या गुन्ह्यांत 'मोस्ट वाँटेड' होते.



# सिंहस्थ महाकुंभची सर्व कामे वेळेतच पूर्ण करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : सिंहस्थ कुंभमेळ्याचा कालावधी लक्षात घेता विविध कामे वेगात सुरू आहेत. सर्व संबंधित यंत्रणा ही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. भारतीय संस्कृतीचा सर्वात मोठा अविष्कार असलेल्या या महासोहळ्याची सर्व कामे निर्धारीत वेळेत पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे ठक्कर डोम येथे आजपासून सुरू झालेल्या तीन दिवसीय सिंहस्थ महाकुंभ भक्ती संगम कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन, पणन मंत्री जयकुमार रावल, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, शालेश शिक्षण मंत्री दादाजी भुसे, महापौर हिमगौरी आडके-आहेर, खासदार शोभा बच्छाव, राजाभाऊ वाजे उपस्थित होते.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने उत्तम सुविधा निर्माण करण्यात येत असल्याचे नमूद करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, साधुग्रामची जागा अडीच हजार कोटी रुपये खर्च करून कायमस्वरूपी अधिग्रहीत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या जागेचा उपयोग भविष्यातही कुंभमेळ्यासाठीच व्हावा, यासाठी त्यांची योग्य पद्धतीने व्यवस्था करण्यात येणार आहे. कुंभमेळ्यासाठी रस्ते, पायाभूत सुविधा तसेच भाविकांसाठी आवश्यक विविध नागरी सुविधा विकसित करण्यात येत आहेत. साधुग्रामच्या जागांबाबत काही नागरिक व शेतकऱ्यांच्या तक्रारी असल्यास त्या संवेदनशीलतेने त्या दूर करण्यात येतील. शक्य त्या सुधारणा करण्यात येऊन संबंधितांना योग्य मोबदला मिळावा, यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. कुंभमेळ्यासाठी खर्च होणाऱ्या निधीतून नाशिक, त्र्यंबकेश्वरसह जिल्ह्यात दीर्घकाळासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण होणार आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असल्याने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरातील नागरिकांना काही प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. याची जाणीव शासन-प्रशासनाला असून कामे पूर्ण झाल्यानंतर नागरिक निश्चितपणे या कामांचे स्वागत करतील. सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी वेळेच्या मर्यादेत पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधण्यात येत आहे. तसेच इतर सर्व संबंधित विभागांनी कामांना गती दिली आहे. कामांमध्ये येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून आवश्यक त्या सर्व उपाययोजना पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सर्वांच्या सहकार्याने सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी दर्जेदार, पारदर्शक पद्धतीने आणि नियोजित वेळेत पूर्ण करून हा कुंभमेळा सुरक्षित, सुव्यवस्थित आणि यशस्वी करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### नाशिकमध्ये तीन दिवसीय महाकुंभ भक्ती संगम सोहळ्याची सुरुवात



भारतीय संस्कृती ही जगातील प्राचीन संस्कृतीपैकी एक आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि विविध ज्ञानशाखांमध्ये हजारो वर्षांपूर्वी आपल्या देशात प्रगत विचार अस्तित्वात होते. भारतीय संस्कृतीची सर्वात मोठी ताकद म्हणजे प्रश्न विचारण्याची आणि नव्या विचारांचा स्वीकार करण्याची परंपरा होय. महाकुंभ या भारतीय संस्कृती, परंपरा आणि विविधतेचा मोठा आविष्कार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या माध्यमातून देशभरातील विविध भक्ती परंपरांचा संगम नाशिकमध्ये अनुभवता येणार आहे. पंजाबपासून महाराष्ट्रापर्यंत, राजस्थानपासून गुजरातपर्यंत तसेच पूर्वोत्तर भारतातील विविध भागांतील भक्ती परंपरांचे दर्शन या सोहळ्यात घडणार आहे. भक्ती संगमच्या माध्यमातून सिंहस्थ कुंभमेळ्याची सुरुवात होत असून ३१ ऑक्टोबर रोजी ध्वजारोहण होईल. साधू-संतांचे आशीर्वाद आणि सर्वांच्या सहकार्याने सिंहस्थ कुंभमेळा निर्विघ्नपणे आणि यशस्वीपणे पार पडेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

सिंहस्थ कुंभमेळा हा केवळ धार्मिक परंपरा नसून भारताची अध्यात्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरा जगासमोर मांडणारा सोहळा आहे. हा कुंभमेळा शासनाचा नव्हे, तर प्रत्येक नाशिककरांचा आहे. त्यामुळे कुंभमेळा सुंदर, स्वच्छ, सुरक्षित आणि सुरेल करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सहभागी होणे आवश्यक आहे. महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी, स्वयंसेवी संस्था आणि समाजातील विविध घटकांनी या महत्त्वपूर्ण आयोजनात आपला सहभाग नोंदवावा, कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी शासन आणि प्रशासनासोबत नाशिककरांनीही एकजुटीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## मन:पूर्वक अभिनंदन!

# माणूस कशाने मोठा होतो?




माणूस कशाने मोठा होतो? हा प्रश्न मला नेहमीच पडायचा. या प्रश्नाचे उत्तर शोधताना माझ्यासमोर तीन पर्याय आले-पैसा, जमीन-जुमला आणि सत्ता. मात्र या तिन्हींपैकी कोणत्याही उत्तराने माझे समाधान झाले नाही. कारण कदाचित मी गवताच्या भाऱ्यात सुई शोधत होतो.

शेवटी माझ्या प्रयत्नांना यश आले आणि मला त्या प्रश्नाचे खरे उत्तर सापडले-

माणूस पैसा, पद किंवा सत्तेने नव्हे, तर माणुसकीच्या पाठबळावर, आपल्या कर्तृत्वाने आणि कर्माने मोठा होतो.

याच विचाराची जिवंत प्रचिती म्हणजे आमचे स्नेही मा. आयु. कमलाकर सोनकांबळे साहेब.

अचंबित करणारी गोष्ट अशी की, आजपर्यंत माझी साहेबांशी प्रत्यक्ष भेट झालेली नाही आणि त्यांच्याशी संवादही झालेला नाही. मात्र त्यांच्या कार्याची आणि व्यक्तिमत्त्वाची ओळख मला त्यांच्या कार्यातून आणि त्यांच्याबद्दल ऐकलेल्या अनुभवातून झाली आहे.



माझ्या व्यवसायाच्या निमित्ताने जवळपास सहा वर्षांपूर्वी माझा संबंध गोगांव गावाशी आला. माझा व्यवसाय महिला-प्रधान असल्यामुळे या सहा वर्षांत गोगांवमधील ताई, माई, माय-माऊली यांच्याशी भाऊ आणि मुलगा या नात्याने माझे स्नेहबंध निर्माण झाले.

या सहा वर्षांच्या काळात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली-

गोगांवकर म्हणजे संस्कार, संस्कृती आणि कर्तव्यनिष्ठेचा सुंदर संगम!

गावातील सांस्कृतिक कार्यक्रम असो, गावची यात्रा असो, कुलदैवताच्या मंदिराचा जीर्णोद्धार असो किंवा सामाजिक उपक्रम-प्रत्येक बाबतीत गोगांवकरांनी दाखवलेली आपुलकी आणि माणुसकी मनाला भावणारी आहे.

माझ्या दृष्टीने तर गोगांव म्हणजे माणुसकीचा खळखळ वाहणारा, निसर्गरम्य झराच! कारण या सहा वर्षांत एकाही गोगांवकराने मला कधी हटकले नाही किंवा माझे मन दुखावेल असे वर्तन केले नाही. उलट प्रत्येकाने आपुलकी आणि स्नेह दिला. याच काळात माझा प्रत्यक्ष संबंध जरी मा. आयु. कमलाकर सोनकांबळे साहेबांशी आला नसला, तरी त्यांच्या अर्धांगिनी, माझ्या भगिनी तथा वहिनी यांच्याशी बांगड्या व कपड्यांच्या व्यवसायाच्या निमित्ताने परिचय झाला. त्यांच्याकडून साहेबांविषयी अनेक गोष्टी ऐकायला मिळाल्या.त्यातून साहेबांचा समाजाप्रती असलेला जिव्हाळा, गावकऱ्यांशी असलेले स्नेहाचे नाते, सामाजिक बांधिलकी आणि कार्य करण्याची तळमळ यांची ओळख झाली. आणि आज जेव्हा कळले की, मा. कमलाकर सोनकांबळे साहेबांना राष्ट्रीय संपादक गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे, तेव्हा मन अक्षरशः भरून आले.

ही केवळ एका व्यक्तीच्या सन्मानाची घटना नाही, तर गोगांवच्या शिरपेचात खोवला गेलेला मानाचा तुरा आहे.

सोनकांबळे घराण्याच्या बाबतीत एक म्हण अगदी तंतोतंत लागू पडते-

**"पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा त्रिलोकी झेंडा!"**

साहेब, आपल्या कर्तृत्वाला माझा मनःपूर्वक सलाम!

आपल्या लेखणीची धार अशीच समाजहितासाठी चालत राहो, आपल्या कार्याचा गौरव दिवसेंदिवस वाढत राहो आणि आपल्या यशाचा सुगंध सर्वदूर दरवळत राहो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

आपल्या चरणकमलावर यशाचा असा अभिषेक सदैव होत राहो आणि आपल्या हातून समाजसेवेची, पत्रकारितेची व लोकहिताची कार्ये अधिकाधिक घडत राहोत.

**आपल्या व्यक्तिमत्त्वाला शब्दरूपी मानवंदना**

**क** – कर्म हेच ध्येय
**म** – मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व
**ला** – लाखमोलाची पत्रकारिता
**क** – कर्तव्यनिष्ठ कार्यकर्ते
**र** – राजासारखे विशाल मन

**सो** – सोन्यासारखी चमकदार लेखणी
**न** – नरवीरासारखे धाडसी कार्य
**कां** – कायद्याचे जाणकार
**ब** – बलशाली प्रतिक्रिया
**ळे** – लळा लावणारे माणूसकीचे व्यक्तिमत्त्व

मनःपूर्वक अभिनंदन!
शतशः अभिनंदन!
त्रिवार अभिनंदन!
आपल्या पुढील यशस्वी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

**आपलाच शुभचिंतक**
**– संजय सोनाबाई चिंतामणी कासार**
**आलूर, ता. उमरगा, जि. धाराशिव**

## संपादकीय....

# अर्थव्यवस्थेवर दबाव

गेल्या सहा महिन्यांमध्ये भारताला इंधन आयातीसंबंधित फार कसरती कराव्या लागल्या आहेत. आधीच जगभरात तणावाचे वातावरण आहे, त्यात कच्च्या तेलाच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. इंधनांसाठी इंधन आयातदार देशांना अपेक्षेपेक्षा जास्त पैसे मोजावे लागत आहेत. होर्मुझ संकटामुळे भारतावर आर्थिक दबाव तयार झाला आहे. होर्मुझ संकटाचा फार मोठा फटका देशाच्या इंधन आयातीवर बसला आहे. गेल्या सहा महिन्याचा आढावा घेतला तर भारताने इंधन आयातीवर २२ अब्ज डॉलर जादा खर्च केला आहे. एकंदरीत, संकटापूर्वी इंधन आयात खर्चासंबंधित जो अंदाज लावण्यात आला होता त्यापेक्षा २२ अब्ज डॉलर जास्त खर्च गेल्या सहा महिन्यात झाला आहे. युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम देशातील आयातदार देशांवर होत आहे. भारताला गेल्या सहा महिन्यात इंधन आयातीवर २२ अब्ज डॉलरचा अतिरिक्त खर्च आला. यातील सगळ्यात जास्त खर्च कच्च्या तेलाच्या आयातीवर झाला आहे. मार्च ते ऑगस्ट महिन्यात कच्च्या तेलाच्या आयातीवर सुमारे २०.५ अब्ज डॉलर रक्कमेचा अतिरिक्त खर्च आला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती वाढत आहेत. परिणामी, भारताला डॉलरची गरज वाढत चालली आहे. जरी गेल्या सहा महिन्यात इंधन आयातीवर २२ अब्ज डॉलर अतिरिक्त खर्च झाले असले तरी भारतावर एकूण १४.४ अब्ज डॉलरचा अतिरिक्त भार तयार झाला आहे. १४.४ अब्ज डॉलर म्हणजे भारताचे दीड दिवसाचे राष्ट्रीय उत्पन्न. एकंदरीत, गेल्या सहा महिन्यात इंधनावर झालेल्या अतिरिक्त खर्चातील १४.४ अब्ज डॉलर इतका भाग भारतासाठी अंदाजित आर्थिक भार आहे. यंदा भारताने एलपीजी आयात २६% ने कमी केली आहे. आखाती देशांकडून एलपीजी आयात करण्यात होणाऱ्या अडचणीमुळे भारताने अमेरिकेचा पर्याय निवडला आहे. आता अमेरिका भारताचा प्रमुख एलपीजी पुरवठादार देश बनला आहे. गेल्या सहा महिन्यात भारताने एकूण ४.७ अब्ज डॉलरचे एलपीजी आयात केले आहे. मार्च ते ऑगस्ट दरम्यान एलपीजी आयातीवर भारताचे सुमारे १.१ अब्ज डॉलर्स अतिरिक्त खर्च झाले आहे. एकंदरीत, एलपीजीची आयात कमी करूनही त्यामागे झालेला खर्च संकटापूर्वीच्या अपेक्षेपेक्षाही जास्त आहे. कच्चे तेल तसेच इतर इंधने महागल्याचा परिणाम फक्त पेट्रोल-डिझेलच्या किंमतीवर होत नाही. हे संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा दबाव तयार करू शकतात.

# मेघमाला व्रत अर्थात माघमाला व्रत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**(२९ ऑगस्ट: जैन मेघमाला वा माघमाला व्रतारंभ दिन.)**

मेघमाला व्रत किंवा माघमाला व्रत) हे जैन धर्मातील अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण उपवास व्रत आहे. हे व्रत प्रामुख्याने आत्मशुद्धी, कर्म मुक्ती आणि इच्छित फलप्राप्तीसाठी केले जाते. जैन ग्रंथ आणि परंपरेनुसार या व्रताची माहिती, प्रारंभ आणि विधी- व्रतारंभ आणि कालावधी- जैन परंपरेत हे व्रत दोन वेगवेगळ्या पद्धतींनी किंवा तिथींनुसार केले जाते: ३१ दिवसांचे व्रत आहे, हे व्रत भाद्रपद कृष्ण प्रतिपदेपासून सुरू होऊन आश्विन कृष्ण प्रतिपदेपर्यंत सलग ३१ दिवस चालते. माघ महिन्यातील व्रत- काही प्रांतांत हे माघ शुद्ध पूर्णिमेला- माघमाला व्रत देखील केले जाते. पूजा विधी- अभिषेक आणि स्थापना- व्रताच्या पहिल्या दिवशी जिनालयात - जैन मंदिरात किंवा घराच्या अंगणात सुंदर सिंहासन किंवा कलश स्थापित केला जा- तो. त्यावर भगवान जिनेंद्रांची- तीर्थंकरांची प्रतिमा विराजमान करून महाअभिषेक केला जातो. श्वेत वस्त्रांचे महत्त्व- या पूजेमध्ये व्रत्याने- व्रत करणाऱ्या व्यक्तीने पांढरे-श्वेत वस्त्र परिधान करणे अत्यंत शुभ मानले जाते. मंदिरातील चंदोवाही पांढऱ्या रंगाचा असावा. १००८ कलश अभिषेक- मेघम ालेच्या- ढगांच्या संततधारेप्रमाणे देवावर १००८ कलशांनी पावन पाण्याचा अभिषेक केला जातो, म्हणूनच याला मेघमाला व्रत म्हणतात. मंत्र जप- पूजा आणि अष्टद्रव्याने अर्घ्य अर्पण केल्यानंतर ॐ ह्रीं पंचपरमेष्ठिभ्यो नमः या मंत्राचा जप केला जातो. उपवास आणि नियम- व्रताच्या काळात कडक संयम आणि ब्रह्मचर्याचे पालन करावे लागते. प्रतिदिन जैन मंदिरामध्ये जाऊन देवदर्शन, सामायिक आणि जिनपूजा करणे अनिवार्य असते. अन्नाचा त्याग करून केवळ शुद्ध पाण्याचे सेवन किंवा एकासण- दिवसातून एकदाच सात्विक भोजन केले जाते. व्रताचे महत्त्व आणि फळ- हे व्रत केल्याने पूर्वजन्मीची पापकर्मे नष्ट होतात आणि आत्म्याला शांती लाभते. संसारिक संकटांम धून मुक्ती मिळून सुख-समृद्धी प्राप्त होते, असे मानले जाते. सदर माहितीपूर्ण संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी प्रस्तुत करताहेत.... संपादक.

व्रत पूजा विधी: मेघमाला व्रताच्या प्रारंभाच्या दिवशी खालीलप्रमाणे धार्मिक विधी केले जातात. अभ्यंगस्नान व वस्त्रे: व्रताची सुरुवात करणाऱ्या भाविकाने सकाळी शुद्ध पाण्याने स्नान करून पवित्र आणि स्वच्छ- शक्यतो पांढरी किंवा नवीन वस्त्रे परिधान करावीत. जिनालयात गमन: सर्व पूजा साहित्य घेऊन जैन मंदिरात-जिनालय जावे. मंदिराला तीन प्रदक्षिणा घालून जिनेंद्रा चरणी साष्टांग प्रणाम करावा. मंडप आणि कलश स्थापना: मंदिराच्या प्रांगणात किंवा योग्य ठिकाणी सुंदर मंडप आणि नूतन वस्त्रा- चे चंद्रोवा- चन्दोवा बांधावा. जमिनीवर पंचरंगी अक्षतांनी अष्टदल कमळ काढावे. तिथे सिंहासन किंवा मंगल कलश स्थापित करून त्यावर थाळी ठेवावी आणि त्यात जिनबिंब- भगवंतांची मूर्ती विराजमान करावी. महाअभिषेक: मेघमालेच्या- पावसाच्या धारेप्रमाणे भगवंतांवर १००८ कलशांनी महाअभिषेक केला जातो. मंत्रजप: मुख्य पूजेनंतर भक्तांनी शांत चित्ताने-

ॐ ह्रीं पंचपरमेष्ठिभ्यो नमः।।

ॐ ह्रीं पंचपरमेष्ठिभ्यो नम:।।।। या मंत्राचा जप किंवा माळ ओढावी.३. व्रताचे नियम: या व्रताच्या कालावधीत साधकाने पूर्ण ब्रह्मचर्याचे पालन करावे लागते.खोटे बोलणे, राग, लोभ, आणि निंदा यांसारख्या मानवी दोषांपासून दूर राहून मन शांत ठेवावे लागते.जैन धर्माच्या मूळ तत्त्वांचे, विशेषतः अहिंसेचे काटेकोरपणे पालन करावे लागते.४. धार्मिक महत्त्व: हे व्रत केल्याने आत्म्यावरील कम र्चे आवरण दूर होते आणि आंतरिक शुद्धी होते, अशी जैन ग्रंथांमध्ये मान्यता आहे.संकटांचे निवारण करण्यासाठी आणि कुटुंबात सुख-समृद्धी, शांती प्रस्थापित करण्यासाठी हे व्रत अत्यंत फलदायी मानले जाते.

मेघमाला व्रतारंभ पौराणिक कथासार : जैन ग्रंथांनुसार, जंबूद्वीपातील भरत क्षेत्रातील हस्तिना- पूर नगरीत देवदत्त नावाचा एक अतिशय श्रीमंत पण अत्यंत कंजूस-कृपण शेठ राहत होता आणि त्याच्या पत्नीचे नाव देवदत्ता होते-

१) लोभी स्वभाव: देवदत्त आणि त्याची पत्नी इतके कंजूस होते की त्यांच्याकडे अपार संपत्ती असूनही ते कोणालाही दानधर्म करत नसत किंवा स्वतःवरही खर्च करत नसत. त्यांच्या या स्वभावाम ुळे त्यांचा जीव नेहमी पैशातच अडकलेला असे.

२) मुनींचे आगमन व उपदेश: एकदा हस्तिना- पूर नगरीत एका जैनमुनींचे- आचार्यांचे आगमन झाले. त्यांच्या दर्शनासाठी संपूर्ण नगरी गोळा झाली. देवदत्त आणि देवदत्ता देखील मुनींचे प्रवचन ऐकण्यासाठी गेले. मुनींनी आपल्या उपदेशात मानवी जीवनाचे महत्त्व, दानधर्माचे फळ आणि आसक्ती- लोभ सोडून आत्मकल्याणाचा मार्ग सांगितला.

३) व्रताची प्राप्ती: मुनींच्या उपदेशाने प्रभावित होऊन शेठ आणि शेठाणीच्या मनातील लोभ दूर झाला. त्यांनी आपल्या पापांचे प्रायश्चित्त करण्यासाठी आणि आत्मशुद्धीसाठी मुनींकडे एका व्रताची मागणी केली. तेव्हा मुनींनी त्यांना मेघमाला व्रत धारण करण्याचा उपदेश केला आणि त्याची विधी सांगितली.

४) व्रताचे पालन व मोक्ष प्राप्ती: देवदत्त आणि देवदत्ता यांनी अत्यंत श्रद्धेने, कडक नियमांचे पालन करत हे ३१ दिवसांचे मेघमाला व्रत पूर्ण केले. या व्रताच्या आणि तपस्येच्या प्रभावाने त्यांचा संपूर्ण लोभ नष्ट झाला आणि त्यांचे विचार पवित्र झाले. आयुष्य संपल्यानंतर या व्रताच्या पुण्यामुळे देवदत्त हा सर्वार्थसिद्धि विमानात अहमिंद्र देव झाला आणि त्याची पत्नी देवदत्ता सोळाव्या स्वर्गात महर्दिक देव झाली. पुढे त्यांनी स्वर्गातून च्युत होऊन पुढील जन्मात मनुष्य जन्म धारण करून मोक्षपद प्राप्त केले. जैन बांधवांची मोक्षप्राप्तीविषयी अशी ही श्रद्धा आहे.

तात्पर्य: जे नर-नारी पूर्ण श्रद्धा ठेवून मेघमाला व्रताचे आचरण करतात, त्यांच्या जीवनातील दारिद्र्य आणि संकटे दूर होतात व शेवटी त्यांना उत्तम गती आणि सुख प्राप्त होते. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! समस्त व्रतस्थ बंधुभगिनींना मेघमाला व्रतारंभ दिनी हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**

**राह. श्रीगुरूदेव हरदेवकृपा निवास, एकता चौक, पॉवर हाऊसच्या मागे, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**

**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# राजकारणातील पडद्यामागील हिरोंची निवडून आल्यानंतर होते उपेक्षा?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : राजकारणात निवडणुकीपूर्वी प्रत्येक कार्यकर्ता, समर्थक आणि शुभचिंतक महत्त्वाचा वाटतो. विजयासाठी दिवस-रात्र मेहनत घेणाऱ्या या पडद्यामागील व्यक्तींच्या योगदानाचा मोठ्या प्रमाणात उल्लेख केला जातो. मात्र निवडणूक जिंकल्यानंतर परिस्थिती बदलते आणि याच पडद्यामागील हिरोंची उपेक्षा होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

निवडणुकीपूर्वी उमेदवाराच्या विजयासाठी रणनीती आखणारे, जनसंपर्क वाढविणारे, मतदारांचा कल जाणून घेणारे आणि भविष्यवाणी करून राजकीय चित्र स्पष्ट करणारे अनेक जण महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र निकाल लागून सत्ता व पद हातात आल्यानंतर यापैकी अनेकांचे फो- नही उचलले जात नसल्याची खंत काही समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे.

निवडणुकीपूर्वी आपली गरज असते, पण निवडून आल्यानंतर साधा फोन करण्यासाठीही वेळ मिळत नाही, अशी भावना काही पडद्यामागील कार्यकर्ते व्यक्त करत आहेत.

राजकारणात विजय हा केवळ एका व्यक्तीचा नसतो. त्यामागे कार्यकर्त्यांची म ेहनत, समर्थकांचे योगदान, रणनीतीकारांचे नियोजन आणि अनेक शुभचिंतकांचा विश्वास असतो. त्यामुळे निवडून आल्यानंतर या सर्वांची आठवण ठेवणे आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करणे ही नेतृत्वाची नैतिक जबाबदारी असल्याचे बोलले जात आहे.

निवडणुकीच्या काळात ज्यांच्या सल्ल्याला आणि भविष्यवाणीला महत्त्व दिले जाते, त्यांचाच निवडून आल्यानंतर फोन न उचलण्याची वेळ येत असेल, तर राजकारणातील 'पडद्यामागील हिरों'च्या योगदानाचे मोल नेमके किती? हा सवाल सध्या चर्चेत आहे.

# कळंब येथे धाराशिव जिल्हा सेवा निवृत्त न्यायालयीन कर्मचारी वृंदांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब /प्रतिनिधी : कळंब येथे सेवानिवृत्त धाराशिव जिल्हा न्यायालयीन कर्मचारी यांचा प्रथम स्नेहमेळावा दिं २२ ऑगस्ट २०२६ रोजी हॉटेल तारा येथे उत्साहात संपन्न झाला. जिल्ह्यातील सर्व सेवानिवृत्त कर्मचारी यांनी एकत्रित यावे त्या निमित्ताने भेटीगाठी होतील व जुन्या आठवणींना उजाळा मिळेल या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी ए.आर.बोरा हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून आर.आर. मुळे, एस. जी. कुलकर्णी, डी.एम. गोरे, व्ही.पी. सूर्यवंशी, एस.एच. मुंडे, ए.के. देशमुख हे उपस्थित होते. या कार्यक्रमात वयाची ७५ वर्ष पूर्ण केलेल्या सेवानिवृत्त कर्मचारी यांचा अमृत महोत्सवी कर्मचारी म्हणून सत्कार करण्यात आला.

यामध्ये धर्माधिकारी बाबा, व्ही. पी. कनगरकर, पी.जी. कुलकर्णी, घाडगे सर, पी.डी. साबळे, कलबुर्गी सर, बी.एन. इगवे, व्ही.एम. गायकवाड, यांचा फेटा, शाल ,श्रीफळ ,बुके व भेटवस्तू देऊन त्यांचे कार्याचा व सेवा योगदानाचा अमृत म होत्सवी वर्षा निमित्त गौरव करण्यात आला.

या प्रसंगी सेवानिवृत्त कर्मचारी एन.यु. लोकरे ,एफ.आर. काकडे, पी.एन. धावारे , व्ही.पी. डोके, व्ही. एन. गायकवाड, डी. एम .गोरे , एम.पी. वालवडकर , श्रीराम काकडे, घाडगे सर, कलबुर्गी सर ,एस. जे. शिवनीकर,एन.एम.गणेश यांनी आपले मनोगते व्यक्त केले.

तसेच अमेरिकेत वास्तव्यास असलेले सेवानिवृत्त कर्मचारी जी.डी. पंडित यांनी संदेश पाठवून मेळाव्यासाठी आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या, कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन प्रजातसिंग राजपूत यांनी तर आभार प्रदर्शन शिरीष देशमुख यांनी केले, या कार्यक्रमाचे आयोजन व जबाबदारी, एन. यु. लोकरे, विजय टोणगे,प्रजातसिंग राजपूत, खंडेराव देशमुख, शहाजी काळे, ए.ए. पठाण, द्रोणाचार्य पुरी, डी.एम. चोंदे , एस.जे. मुल्ला,विश्वनाथ जाधव ,शिरीष देशमुख, ए.डी. घुले, हरी सुरवसे यांनी पार पाडली. या कार्यक्रमाला धाराशिव जिल्ह्याम धील सर्व सेवा निवृत्त कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला व असेच कार्यक्रम वारंवार घेण्याबाबत सहमती दर्शविली. तसेच कळंब येथील सर्व सेवानिवृत्त कर्मचारी बांधवांनी कार्यक्रमाचे आयोजन करून भेटीगाठीसाठी संधी दिली याबद्दल कृतज्ञता पूर्वक आनंद व्यक्त केला व एकमेकांना शुभेच्छा देत पुन्हा भेटूया म्हणत सर्वांनी निरोप घेतला.

## नळदुर्ग शहराच्या वतीने भव्य सत्कार

# संकेत शिंदे यांची पोलिस उपनिरीक्षकपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नळदुर्ग/बाबासाहेब बनसोडे

नळदुर्ग येथील जाधव परिवाराचे भाचे संकेत उमाकांत शिंदे यांची महाराष्ट्र पोलिस दलात पोलिस उप निरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे ही निवड झाल्यामुळे नळदुर्ग शहराच्या वतीन भव्य सत्कार करण्यात आला

नळदुर्ग येथील नळदुर्ग नगरीचे विद्यमान नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गटनेते व नगरसेवक मारुती खारवे पाणीपुरवठा सभापती नगरसेवक तानाजी जाधव उप- स्थित होते

माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या निवासस्थानी झालेल्या या सत्कार समारंभात पोलीस उपनिरीक्षक संकेत शिंदे यांचा व त्यांचे वडिल सेवानिवृत्त प्राध्यापक उमाकांत शिंदे यांचा सत्कार करण्यात आला

यावेळी बोलताना नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी संकेतच्या यशाबद्दल कौतुक केले आजच्या युवती व युवक तरुणाने संकेत शिंद यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शासनकर्ती जमात बनण्यासाठी प्रयत्न करावा आशी भावना नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी व्यक्त केली

यावेळी नगरसेवक मारुती खारवे आणि नगरसेवक तानाजी जाधव यांनी मनोगत व्यक्त करताना संकेत शिंदे यांचे कौतुक केले..

सत्काराला उत्तर देताना पोलीस उपनिरीक्षक संकेत शिंदे यांनी आपल्या यशात आई वडिलांची पुण्याई व त्यांचे कष्ट कारणीभूत ।आहेत.. मी त्यांचे सगळे स्वप्न पूर्ण करणार असल्याचे त्यांनी सांगितले..

सेवानिवृत्त प्राध्यापक उमाकांत शिंदे यांनी आपल्याला मनोगतात सर्वांचे आभार मानले व मुलाच्या यशाचे कौतुक केले..

या कार्यक्रमास श्रीनिवास अहंकारी,सन्नी उमाकांत शिंदे,रमेश जाधव, उमेश जाधव, संतोष वाले, सुहास पुराणिक, मुकुंद भूमकर बंडाप्पा कसेकर,प्रदीप ग्रामोपाध्ये, सन्नी भूम कर,संतोष नाईक, भावेश जाधव यांच्यासह नागरिक उपस्थित होते..

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी मानले..

# आंदेवाडी ग्रामपंचायतीतील विकासकामांची चौकशी करा; ग्रामस्थांचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी प्रतिनिधी/ निंगप्पा निंबाळ : अक्कलकोट तालुक्यातील आंदेवाडी जहांगीर ग्रामपंचायतीमध्ये सन २०२२-२३ ते २०२५-२६ या आर्थिक वर्षांत विविध विकासकाम ांसाठी प्राप्त झालेल्या निधीच्या वापराबाबत ग्रामस्थांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. गावात वॉटर फिल्टर, बाकडे, डस्टबिन आदी सुविधा प्रत्यक्षात उपलब्ध नसतानाही त्यासाठी निधी खर्च झाल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आल्याचा आर- ोप ग्रामस्थांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

यासंदर्भात समस्त आंदेवाडी जहांगीर ग्रामस्थांच्या वतीने अक्कलकोट पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदन देण्यात आले. सन २०२२-२३ ते २०२५-२६ या कालावधीत ग्रामपंचायतीला प्राप्त झालेल्या निधीचा वापर कोणत्या कामांसाठी करण्यात आला, मंजूर कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली आहेत का, त्यावर किती खर्च करण्यात आला आणि कामांची गुणवत्ता कशी आहे, याची पडताळणी करण्याची म ागणी करण्यात आली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, काही कामांवर निधी खर्च झाल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आले असले तरी प्रत्यक्ष गावात संबंधित सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सन २०२२-२३ पा- सून ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आलेल्या सर्व विकासकामांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी व तपासणी करावी. तसेच खर्चाची बिले, मोजमाप पुस्तिका, प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी आणि इतर संबंधित कागदपत्रांची तपासणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

निधीच्या वापरामध्ये गैरव्यवहार किंवा अनियमितता आढळल्यास संबंधितांवर नियम ानुसार कठोर कारवाई करावी. ग्रामसेवक व सरपंच यांनी कामे न करता बिले काढली असल्याचे चौकशीत सिद्ध झाल्यास संबंधितांची सखोल चौकशी करून नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

तसेच या प्रकरणाची माहिती ग्रामस्थांसमोर पारदर्शकपणे मांडण्यासाठी लवकरात लवकर ग्रामसभा घेण्यात यावी. ग्राम सभेत सन २०२२-२३ पासून झालेल्या विकासकामांचा खर्च, निधीचा तपशील आणि प्रत्यक्ष कामांची माहिती सादर करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

निवेदन देताना रेवणसिद्धा पाटील, अप्पराव पाटील, सिद्धराम जमादार, माजी सरपंच भोजप्पा कलमणी यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## ग्रामस्थांचा उपोषणाचा इशारा

**सन २०२२-२३ पासून ग्रामपंचायतीमार्फत झालेल्या सर्व विकासकामांची सखोल चौकशी करून प्रत्यक्ष जागेवर पाहणी करण्यात यावी. निधीचा गैरवापर किंवा कामांमध्ये अनियमितता आढळल्यास संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी. चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात आली नाही, तर पंचायत समितीसमोर उपोषणास बसू, असा इशारा ग्रामस्थ रवी पाटील यांनी दिला.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# दुधनीतील भीमनगर ७५ वर्षांपासून विकासाच्या प्रतीक्षेत

## रस्ते, गटारी, पिण्याचे पाणी, स्वच्छता अन् विजेच्या समस्यांनी नागरिक त्रस्त; प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी प्रतिनिधी/ निंगप्पा निंबाळ : दुधनी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी शहरातील भीमनगर परिसर गेल्या तब्बल ७५ वर्षांपासून अपेक्षित विकासापासून वंचित असल्याची खंत परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक दशके उलटूनही भीमनगरमधील नागरिकांना आजही रस्ते, गटारी, पिण्याचे पाणी, स्वच्छता, वीज यांसारख्या मूलभूत नागरी सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र आहे. विकासाच्या बाबतीत शहरातील इतर भागांच्या तुलनेत भीमनगर परिसराकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.



भीमनगर हा दुधनी शहरातील महत्त्वाचा व लोकवस्तीचा परिसर असून येथे मोठ्या संख्येने नागरिक वास्तव्यास आहेत. मात्र, वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत नागरी सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होत आहे. परिसरातील अनेक रस्त्यांची अवस्था खराब असून काही ठिकाणी पावसाळ्यात चिखल व पाणी साचल्याने नागरिकांना ये-जा करणे कठीण होते. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांना याचा विशेष त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिक सांगतात.

गटारींच्या अभावामुळे सांडपाण्याचा प्रश्न

भीमनगर परिसरातील गटारींचा प्रश्न अनेक वर्षांपासून कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही ठिकाणी गटारी अपुऱ्या असल्याने सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होत नाही. परिणामी सांडपाणी रस्त्यावर किंवा रहिवासी भागाजवळ साचण्याची परिस्थिती निर्माण होते. पावसाळ्यात पावसाचे पाणी आणि सांडपाणी एकत्र झाल्याने नागरिकांची गैरसोय अधिकच वाढते.

साचलेले पाणी, अस्वच्छ परिसर आणि कचऱ्याची समस्या यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नियमित स्वच्छता, कचरा संकलन आणि सांडपाण्याचा योग्य निचरा करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही कायम

भीमनगर परिसरातील नागरिकांसमोर पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. नियमित आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा उपलब्ध व्हावा, यासाठी प्रशासनाने ठोस नियोजन करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पाण्यासारख्या मूलभूत सुविधेसाठी नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

विकासकामांसाठी शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून विविध योजनांतून निधी उपलब्ध होत असतो. मात्र, या निधीतून भीमनगरसारख्या मागासलेल्या भागातील मूलभूत प्रश्नांना प्राधान्य का दिले जात नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

वर्षानुवर्षे मागण्या, मात्र समस्या कायम

भीमनगर परिसरातील रस्ते, गटारी, पाणी, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधांबाबत नागरिकांनी वेळोवेळी प्रशासन व संबंधित लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास समस्या आणून दिल्याचे सांगण्यात येते. मात्र, अनेक वर्षे उलटूनही अपेक्षित स्वरूपात विकासकामे न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

नागरी सुविधा हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असून परिसरातील नागरिकांनाही शहरातील इतर भागांप्रमाणे समान सुविधा मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष विकासकामांना सुरुवात करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करावी

भीमनगर परिसराची प्रशासनाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून तेथील वस्तुस्थिती जाणून घ्यावी. नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात आणि प्राधान्यक्रम निश्चित करून विकासकामांचा आराखडा तयार करावा, अशी मागणी होत आहे.

रस्त्यांची दुरुस्ती व नवीन रस्त्यांची कामे, गटारींचे बांधकाम व सांडपाणी निचरा व्यवस्था, नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, आवश्यक ठिकाणी पथदिवे तसेच इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. संबंधित विभागांनी समन्वय साधून भीमनगरच्या विकासासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

७५ वर्षांचा विकासाचा वनवास संपणार कधी?

स्वातंत्र्यानंतर देशाने विविध क्षेत्रांत मोठी प्रगती केली असताना दुधनीतील भीमनगर परिसरातील नागरिकांना अजूनही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे ७५ वर्षांचा विकासाचा वनवास संपणार कधी? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

आता तरी प्रशासन व लोकप्रतिनिधींनी भीमनगर परिसराच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. केवळ तात्पुरती डागडुजी न करता नियोजनबद्ध पद्धतीने रस्ते, गटारी, पाणी, स्वच्छता व इतर नागरी सुविधांचा सर्वांगीण विकास करावा, अशी जोरदार मागणी भीमनगरवासीयांनी केली आहे.

### नागरिकांच्या प्रमुख मागण्या

- भीमनगर परिसरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती व मजबुतीकरण करावे.
- नवीन व आवश्यक ठिकाणी गटारी बांधून सांडपाण्याचा कायमस्वरूपी निचरा करावा.
- नियमित व पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा.
- परिसरात नियमित स्वच्छता व कचरा संकलनाची व्यवस्था करावी.
- आवश्यक ठिकाणी पथदिवे व विद्युत सुविधांची पूर्तता करावी.
- पावसाळ्यात पाणी साचणाऱ्या ठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना करावी.
- प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून सर्व समस्यांचा विकास आराखडा तयार करावा.
- प्रलंबित विकासकामांना निधी उपलब्ध करून तातडीने सुरुवात करावी.



# रांजणी येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती मिरवणूक उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील रांजणी येथे २५ आगस्ट २०२६ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला सजवलेल्या रथातून भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. त्यांच्या प्रतिमेचे पूजन गावचे सरपंच राजाभाऊ आगरकर, उपसरपंच अन्सार शेख, लहुजी शक्ती सेना महासचिव बालाजी गायकवाड, मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे, सदस्य राहुल पवार, तंटामुक्ती अध्यक्ष मतीन पटेल, फेरोज पठाण, प्रदीप ठोंबरे, नाना गायकवाड, सुरेंद्र बनसोडे, वाहेद शेख, विकास गायकवाड, शंकर ताटे, ईश्वर ताटे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

ही मिरवणूक बसस्टँड पासून ढोल, ताशे, लेझीम, बँड पथकाच्या गजरात वाजत गाजत महामानवांच्या जयघोषात गावात पोहोंचली. या वेळी अण्णाभाऊ साठे यांच्या जिवन चरित्रावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या जयंती निमित्त अण्णाभाऊ साठे यांचे विचार पोंहचवण्यासाठी जयंती उत्सव समीतीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्हा परिषद प्रशाला रांजणी, हजरत ख्वाजा बद्रोदिन विद्यालय, जिल्हा परिषद वस्तीशाळा या ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

या वेळी जयंती उत्सव समितीचे विलास सोनपारखे, बापू सोनपारखे, श्रावण सोनपारखे, दीपक सोनपारखे, नितीन सोनपारखे, धर्मराज सोनपारखे, नानासाहेब सोनपारखे, आदित्य सोनपारखे, उमेश सोनपारखे, रामा सोनपारखे, अण्णासाहेब सोनपारखे, भाऊराव सोनपारखे, साहेबराव सोनपारखे, फकीरा सोनपारखे, भाऊ सोनपारखे, जगन सोनपारखे, शाहू सोनपारखे, लखन सोनपारखे, दगडू सोनपारखे, गौरव सोनपारखे,बाळु वैरागे, आदींनी परिश्रम घेतले या जयंती मिरवणुकीत समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी शिराढोण पोलिस ठाण्याचे पोलिस बंदोबस्तासाठी उपस्थित होते.

### नगर सेवक मारुती खारवे यांची वरिष्ठाधिकारी यांच्या कडे मागणी

# नळदुर्ग व परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्याबाबत प्रसिद्ध बातम्यांची चौकशी करून अवैध धंदे बंद करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग ता. तुळजापूर व परिसरात अवैध धंदे मोठ्या प्रमाणात चालू असून या संदर्भात विविध वृत्तपत्रातून व सोशल मीडिया च्या माध्यमातून अनेक वेळा बातम्या प्रकाशित होऊनही अध्याप अवैध धंद्याला आळा बसलेला नसून नेमकं या अवैध धंद्याला अभय कोणाचे आहे याबाबत संबंधित वृत्तपत्रातील बातम्यांची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी नळदुर्ग नगर परिषदेचे नगरसेवक तथा विरोधी पक्ष गट नेते मारुती सुदाम खारवे यांनी लेखी निवेदनाद्वारे अप्पर मुख्य सचिव (गृह), गृहविभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांच्या कडे केली आहे.



. या. बाबत मारुती खारवे यांनी दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की नळदुर्ग व परिसरात मोठ्या प्रमाणात कल्याण मुंबई मटका, चक्री मटका, हात भट्टी दारू विक्री वगरे अवैध्य धंदे चालू असून या संदर्भात वारंवार विविध वृत्तपत्रातून सोशल मीडिया वरून यूट्यूब चैनल वरून बातम्या प्रकाशित झालेल्या आहेत. तरी परंतु येथील स्थानिक पोलीस प्रशासन किंवा संबंधित प्रशासनाकडून म्हणावी तशी कसल्याही प्रकारची हालचाल होताना दिसत नाही.यासंदर्भात उपविभागीय पोलीस अधिकारी धाराशिव यांना लेखी निवेदन दिले असता त्यांनी उलट तुम्ही आम्हाला अवैध धंद्याचे लोकेशन पाठवा ठोस पुरावे पाठवा त्यांची नावे सांगा किंवा सीसीटीव्ही फुटेज असतील तर ते द्या मग आम्ही योग्य ती कारवाई करू असे बेजबाबदार पणाचे वक्तव्य केले आहे. यामुळे स्थानिक पोलीस प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर संशय निर्माण होत असून अनेक प्रश्नचिन्ह उभे राहत आहेत. त्यामुळे एखाद्या निवेदनाचा किंवा एखाद्या तक्रारी संदर्भाची चौकशी करण्याची जबाबदारी नेमकी कोणाची आहे फिर्यादीची की पोलीस प्रशासनाची असा प्रश्न पडला अजून स्थानिक पोलीस प्रशासनाबाबत प्रश्न चिन्ह निर्माण होता आहे.तेंव्हा आमच्याकडे असलेल्या वृत्तपत्रातील बातम्यांच्या कात्रणासहित आपल्याकडे निवेदन देण्यात येत आहे तरी या निवेदनाची जाणीवपूर्वक दखल घेऊन या प्रकरणी सखोल चौकशी करून योग्य ती कडक कारवाई करावी व नळदुर्ग आणि परिसरातील अवैद्य धंदे बंद करावे. असी मागणी करण्यात येत आहे.

. मा.अप्पर मुख्य सचिव(गृह) गृहविभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांच्या कडून आता नेमकी काय कारवाई केली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नंगपुरामुर्री शासकीय निवासी शाळेत पालकसभा मोठ्या उत्साहात

**पालकांचा उत्स्फूर्त सहभाग : शिस्त, संस्कार व अभ्यासावर संवाद**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील छत्रपती शिवाजी महाराज पब्लिक स्कूल अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा याठिकाणी (दि.२४) दुपारी पालकसभा मोठ्या उत्साहाने संपन्न झाली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक नीता भलमे, पुष्करराज लांजेवार, व मुन्नाभाई नंदागवळी आदी मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांना अभ्यास, शिस्त, संस्कार तसेच चांगल्या सवयी यावर मार्गदर्शन करण्यात आले. पालकांशी संवाद साधताना विद्यार्थी अभ्यास करतो की नाही. तसेच त्याची गुणवत्ता, सर्वागीण विकास यावरही प्रकाश टाकण्यात आला.

यावेळी जास्तीत जास्त पालकांचा सहभाग होता. यामध्ये आशा गोवर्धन वारके, देविका गंगाधर जांभुळकर, विशाखा हितेश वंजारी, रविन भिमराज वंजारी, आम्रपाली बोरकर, लता वासनिक, विनोद मळकाम, योगराज जांभूळकर, रोशन वालदे,नितु महेश राउत, महेश राऊत, संजना राऊत, सुविना राऊत, शिल्पा सांगोळे, देवानंद साऊस्कर, जितेन्द्र भैसारे, सुदेश भोवते, अमरदिप वासनिक, बळीराम जांभुळकर यांचा सहभाग होता.

सभेचे संचालन व प्रदीप ढवळे यांनी केले.

### रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात नडगाव येथे अनोखे आंदोलन

### मंगळागौरीच्या माध्यमातून प्रशासनाचे वेधले लक्ष, लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

# शहापूर-मुरबाड-खोपोली मार्गासाठी महिला शक्तीचा एल्गार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर : विजय घनघाव

शहापूर-मुरबाड-खोपोली मार्गाची झालेली दुरवस्था, ठिकठिकाणी पडलेले जीवघेणे खड्डे आणि रखडलेली कामे यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शहापूरनजीक नडगाव येथे महिला शक्तीने अनोख्या पद्धतीने एल्गार पुकारला.







रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात आंदोलनकर्त्या महिलांनी थेट मुख्य रस्त्यावर उतरून मंगळागौर खेळाचे आयोजन करत प्रशासनाचे लक्ष वेधले. महिलांच्या या अनोख्या आंदोलनाने परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक मंगळागौरीच्या माध्यमातून महिलांनी आपल्या संतापाला आणि मागण्यांना प्रभावीपणे वाट करून देत रस्ता हवा, सुरक्षित प्रवास हवा असा ठाम संदेश प्रशासनाला दिला.

या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून महिला, विद्यार्थी, कामगार, वाहनचालक आणि सर्वसामान्य नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. खड्डे, खराब रस्ता आणि रखडलेल्या कामांमुळे अपघातांचा धोका वाढला असून, प्रशासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

या आंदोलनाचे मुख्य आयोजन चंद्रकला दुर्गे यांनी केले. त्यांच्या पुढाकाराला महिला, नागरिक, विद्यार्थी तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या विद्याताई वेखंडे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अपर्णा खाडे, पत्रकार आशाताई पडवळ, काशिनाथ तिवरे, माजी आमदार पांडुरंग बरोरा, भाजपचे भास्कर जाधव व अरुण पानसरे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे बबन सातपुते व विनायक सापळे, पत्रकार राजेश जगरे, काँग्रेसचे प्रकाश भांगरथ तसेच किसन हायस्कूलचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

विशेष म्हणजे, विविध राजकीय विचारधारा बाजूला ठेवून नागरिकांच्या मूलभूत प्रश्नासाठी सर्वजण एकत्र आले, हे या आंदोलनाचे वैशिष्ट्य ठरले.

महिलांच्या या आक्रमक मात्र शांततामय आंदोलनाची प्रशासनाने गंभीर दखल घेतली. संबंधित यंत्रणेकडून तातडीने उपाययोजना करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आंदोलन मागे घेतले. त्यामुळे महिला शक्तीच्या या लढ्याला मोठे यश मिळाले आहे.

दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी शहापूर पोलीस निरीक्षक कदम यांच्या नेतृत्वाखाली पोलिस प्रशासनाने उत्तम सहकार्य केले. पोलिसांच्या सहकार्यामुळे आंदोलन शांततेत, शिस्तबद्ध आणि लोकशाही मार्गाने पार पडले.

या आंदोलनाने केवळ रस्त्याच्या दुरवस्थेचा प्रश्न उपस्थित केला नाही, तर महिला शक्तीची एकजूट, सर्वपक्षीय सहकार्य आणि जनतेच्या प्रश्नांसाठी एकत्रितपणे उभे राहण्याची ताकद अधोरेखित केली आहे.

आता प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनाची तातडीने आणि प्रभावी अंमलबजावणी करून शहापूर-मुरबाड-खोपोली मार्गाची दुरवस्था दूर करावी, रखडलेली कामे मार्गी लावावीत आणि नागरिकांना सुरक्षित प्रवासाची हमी द्यावी, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

महिला शक्ती एकवटली की परिवर्तन घडते! नडगाव येथील या आंदोलनाने हा संदेश पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

# भाकर नाही पोटाला लागली कातरी लेबरच्या खिशाला, साहेब आतातरी करा सुरुवात चौकशीला

## नळदुर्ग येथे घनकचरा व्यवस्थापन कामात नियमांचे उल्लंघन शासनाची डोळेझाक; संबंधित अधिकाऱ्यांचे यशश्री इंटरप्राईजेस कंपनीला अघोषित सहकार्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : भाकर नाही पोटाला,कात्री लागली लेबरच्या खिशाला, साहेब आता तरी करा सुरुवात चौकशीला या म्हणी प्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांचे यशस्वी इंटरप्राईजेस कंपनीला अघोषित सहकार्य असल्याचे बोलले जात आहे यासाठी घनकचरा व्यवस्थापन व नळदुर्ग सारख्या ऐतिहासिक शहरांमध्ये आणि कामांमध्ये पारदर्शकता यावी या उद्देशाने नळदुर्ग नगर परिषदेचे नगरसेवक तथा गटनेते मारुती खारवे यांनी लेखी निवेदन सादर केलेले होते परंतु या अनेक वेळी लेखी आणि तोंडी निवेदनाला नगरपालिका प्रशासनाकडून केराची टोपली मिळाली आहे .

नळदुर्ग शहरात घनकचरा व्यवस्थापनाचा खूप खळबळ जनक प्रकार पाहायला मिळत असून निविदा प्रक्रिया आणि खर्चातील अनियमतता दिसून येत आहे दररोज ट ठ कोड स्कॅनिंग होत नसल्याचे दिसून आले आहे करारानुसार घरोघरी कचरा संकलन करताना किंवा ट ठ कोड करणे बंधनकारक आहे मात्र ते प्रत्यक्षात होत नसल्याने निदर्शनास आले आहे दर पंधरा दिवसांनी होणाऱ्या फॉगिंग आणि रोग प्रतिबंधक औषधी फवारणी करणे ठेकेदारावर बंधनकारक आसताना परंतु फवारणी वेळेवर केली जात नसल्याचे दिसून आले आहे शिवाय २४ तास तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे बंधनकारक आहे तेही केल्याचे दिसून येत नाही शिवाय नागरिकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्यास ५०० रुपये दंडाची आकारणी करून प्रत्यक्षात दंडाची कारवाई किंवा ठेकेदाराकडून वसुली करण्यात यावी .




कामगारांचे शोषण करणे सुरक्षा साहित्याचा अभावा आणणे यामध्ये ठेकेदाराने कामगारांना झाडू , गमबूट , मास्क , हँड ग्लोज रेनकोट , त्या कामगाराचा विमा काढणे आवश्यक आहे परंतु असे काहीही दिसून येत नाही नळदुर्ग शहरातल्या घनकचरा व्यवस्थापन कामात सततचे काम आणि नियमांचे उल्लंघन करून ए झ ऋ आणि ए ड ख उ किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे आवश्यक आहे परंतू नियमांचे सर्रास उल्लंघन होत असून कामगारांना वेळेवर पगार किंवा सुरक्षा साधने मिळत नसल्याचे कामगारातून बोलले जात आहे दिसून येत आहे

शहरात कामावरील प्रत्येक घंटागाडी चालकाने रोजच्या कामाबाबत नागरिकांच्या स्वाक्षऱ्या असलेली काम डायरी निभावणे आवश्यक आहे किंवा बंधनकारक आहे तेही दिसून येत नाही शहरातील मोकाट जनावरे कुत्रे , डुक्कर , यांच्यावरही घनकचरा व्यवस्थापनाचा अंकश दिसून येत नाही .दुर्गा नगर शेजारी नगर परिषदेने बांधलेल्या कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्पामध्ये सदर कंपनीने करारानुसार दहा महिन्यांमध्ये ओला व सुका कचरा विलगीकरण करून खत निर्मिती केली नाही तसेच प्लास्टिक घनकचऱ्याचे निर्मूलन ही केलेले नाही सदर कचरा शासकीय वन विभागाच्या जागेत टाकत असल्याचे दिसून येत असून या कचऱ्याचा प्रदूषण आणि पर्यावरणास धोका निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे याबाबत प्रशासनाने दखल घेऊन संबंधित ठेकेदारावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे कंत्राटदाराला नियमभंग करण्या बाबत समितीने करावयाची प्रमुख मागणी ठेकेदारला आतापर्यंत केलेल्या सर्व देयकाची बिल्स व बँक स्टेटमेंट ची कसून तपासणी करण्यात यावी अटींचा नियमभंग केल्यास ठेकेदाराची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून कंत्राट रद्द करणे योग्य होईल याबाबत कमिटीने जातीने लक्ष घालून प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करूनच निर्णय घ्यावा तसे न केल्यास नियमांचे उल्लंघन केलेले अशा तक्रारी असताना सुद्धा नियमांचं उल्लंघन करणाऱ्या मजूर किंवा ठेकेदारावर अधिकारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी ही योग्य राहील सदरील माझी मागणी ही नळदुर्ग शहरातल्या नागरिकांना कराराप्रमाणे स्वच्छता सेवा मिळावी , प्रत्येक गल्ली बोळात घंटागाडी फिरावी , प्रत्येकाच्या घरातील ओला कचरा सुका कचरा वेगळा करून ते त्या ठिकाणा वरून उचलण्यात यावा नळदुर्ग शहर स्वच्छ शहर, सुंदर शहर असावं .अशा प्रकारच्या मागणीसाठी घनकचरा चौकशी कमिटी समोर तक्रारदार म्हणून मी मारुती सुदाम खारवे नगरसेवक तथा गटनेता नळदुर्ग नगरपरिषद तोंडी व लेखी जबाब देत आहे हा जबाब खरा समजून संबंधित दोषीवर योग्य ते कारवाई करावी आणि नळदुर्ग शहरातील घनकचरा व्यवस्थापनातील दर्जा उंचवावा

---

## पंढरपुरात दिवसाढवळ्या घरफोडी; १७ लाख रुपयांचा सोने व चांदीचा ऐवज लंपास




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील वांगीकर नगर येथील कुलूप तोडून सुमारे १८ लाख ४९ हजार रुपये किमतीचा सोन्याचा ऐवजी लंपास केली ती घटना समोर आली आहे. २५ ते २६ ऑगस्टच्या दरम्यान झालेल्या घरफोडीमध्ये परिसरात कबड्डीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुन्हा एकदा सुरक्षितेचा प्रश्न उपस्थित केला जात आहे . वांगीकर नगर येथील कुचेकर बिल्डिंग येथील एका फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने त्या घरातील सोन्याचा आवाज लंपास केला व चोरीस गेलेल्या ऐवजाचि किंमत समोर अठरा लाख एकूण पन्नास हजार असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. याप्रकरणी संगीता राजेंद्र काळे आणि पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अज्ञात चोरट्यांचा घरफोडी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटने कडून चोरट्याचा शोध सुरू असून परिसरातील संबंधित सीसीटीव्ही फुटेज व इतर संबंधित तांत्रिक बाबीचे आधारे तपास केला जात आहे. पोलीस उपनिरीक्षक प्रशांत जगताप पुढील तपास करीत आहे.

शहरातील वजडीच्या जागेत घरपोडीची घटना घडली असल्याने दिवसाढवळ्या किंवा कमी वर्षांच्या काळात घर पुढच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांची गस्त आणि सुरक्षा व्यवस्था अधिक प्रभावी करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

पंढरपूर शहरात २५ ऑगस्ट रोजी झालेल्या घर पुढे अवघ्या ४८ तासात पोलिसांनी तपास लावला आहे. पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून १७ लाख रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने जप्त केले आहे. हे केलेल्या तपासात पोलिसांनी ४८ तासात तपास केल्यानंतर त्यामुळे त्यांचे शहरांमध्ये कौतुक केले जात आहे. याप्रकरणी सुजित कुमार रजपूत यांना पोलिसांनी अटक केली आहे. और कहा मध्य प्रदेश मधला असून सध्या आडेगाव टेंभुर्णी येथे येथे राहत असल्याची माहिती पोलिसांकडून दिली आहे. पोलिसांनी चक्री फिरवून त्यांनी आरोपीस ताब्यात घेतला आहे. घेतल्यानंतर चोरीची चौकशी व मुद्देमालाबाबत माहिती मिळाल्यानंतर आरोपीकडून १७ लाख रुपयाची सोन्या-चांदीची दागिने जप्त केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे, आणि पोलीस उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश ढवन, आणि पोलीस उपनिरीक्षक प्रशांत जगताप यांचे महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कारवाईसाठी अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी अवघ्या ४८ तासात गुण्याचा छडा लावून चोरीचा मोठा मुद्देमाल हस्तगत केल्याने पंढरपूर शहर पोलीस ठाण्याच्या पथकाचे कौतुक केले जात आहे.

---

## वागदरी भीम नगर वतीने कमलाकर सोनकांबळे यांचे सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वांगदरी : ऑल इंडिया संपादक संघाच्या वतीने दैनिक यश सिद्धी न्यूजचे संपादक मा. कमलाकर सोनकांबळे यांना पत्रकारिता व संपादकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रीय संपादक गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल भीम नगर मित्र परिवार वागदरीच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले. यावेळी शिवा आसुदे, महादेव सोनकवडे, सिताराम कुंबळे, सागर वामने, भीमा कोल्हे , शशी नडगेरी, तम्मा नडगेरी, महेश लोंढे, सोनू ख्याले, दीपू असुदे, अविरत पात्रे प्रदीप भटारे आदी उपस्थित होते.



---

## वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे... वृक्ष माझा बंधूराज...!; शासकीय निवासी शाळेचा उपक्रम : राखी मेकिंग स्पर्धा व वृक्ष रक्षाबंधन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील छत्रपती शिवाजी महाराज पब्लिक स्कूल अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा या ठिकाणी रक्षाबंधनानिमित्त एक अनोखा संकल्पना जपली. ही संकल्पना जपून अंमलात आणली. म्हणून सदर शाळेचे विद्यार्थी म्हणतात, वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे... वृक्ष माझा बंधूराज...! असा आगळा-वेगळा उपक्रम राबवून यशस्वी केला.



सदर शाळा ही जिल्ह्यातील उपक्रमशील शाळा असे नावलौकिक आहे. वेगवेगळे उपक्रम राबविताना हा अनोखा उपक्रम हाती घेत राखी मेकिंग स्पर्धा राबवली. यात उत्कृष्ट रक्षाबंधन तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस दिली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले, शिक्षक प्रदीप ढवळे यांनी दिले.

**या राखी केल्या तयार**

याप्रसंगी शाळेतील वर्ग सहावी ते दहावी वर्गाच्या मुलांनी कागदी राखी, पानांची राखी, महापुरुष राखी, स्टार राखी, स्टोन राखी अशा वेगवेगळ्या रक्षाबंधन तयार केल्या.

**पर्यावरणीय सामाजिक संदेश दिला**

सदर शाळेत राखी मेकिंग स्पर्धा राबवताना विद्यार्थ्यांनी शालेय परिसरातील वृक्षांना राखी बांधली. त्यांचे औक्षण केले. अशाप्रकारे पर्यावरणीय सामाजिक संदेश यावेळी दिला. वृक्षांसोबत आपले नाते संबंध हे मानवी घटकांसारखे असावे. वृक्षवल्ली हे आमचे सोयरे नातेवाईक आहेत. ही संकल्पना शाळेतील शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांनी राबविली असून मौलिक संदेश व जनजागृती केली. असेही यामधून सांगितले आहे. या संपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी शिक्षिका नीता भलमे, नीशा गभणे यांनी आयोजित करून सहकार्य केले. अशाप्रकारे हा उपक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

---

### ह्युमन सोशल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या वतीने सांगवी पोलिस स्टेशनमध्ये रक्षाबंधन उत्साहात

## पोलिस बांधवांना राखी बांधून व्यक्त केला कर्तव्याप्रती आदर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगवी : रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त ह्युमन सोशल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या वतीने सांगवी पोलिस स्टेशन येथे विशेष रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य तसेच महिला सदस्यांनी सांगवी पोलिस स्टेशनमधील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राखी बांधून त्यांच्या कर्तव्याप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी पोलिस बांधवांना रक्षाबंधनाच्या मन:पूर्वक शुभेच्छाही देण्यात आल्या.



समाजाची सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस अधिकारी व कर्मचारी अहोरात्र आपले कर्तव्य बजावत असतात. सण-उत्सवाच्या काळातही कुटुंबापासून दूर राहून समाजाच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या पोलिस बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी संस्थेच्या महिला सदस्यांनी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हातावर राखी बांधून त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी, सुख-समृद्धीसाठी आणि सुरक्षिततेसाठी शुभेच्छा दिल्या. राखी बांधण्याच्या या भावनिक क्षणी पोलिस अधिकारी व महिला सदस्यांमध्ये बहीण-भावाचे जिव्हाळ्याचे नाते अनुभवायला मिळाले.

या प्रसंगी सांगवी पोलिस स्टेशनचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ह्युमन सोशल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या या उपक्रमाचे कौतुक करून संस्थेच्या पदाधिकारी, सदस्य व महिला सदस्यांचे आभार मानले. रक्षाबंधनाच्या निमित्ताने पोलिस आणि समाज यांच्यातील विश्वास, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचा धागा अधिक मजबूत करणारा हा उपक्रम अत्यंत भावपूर्ण आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. ह्युमन सोशल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या या उपक्रमामुळे रक्षाबंधनाच्या सणाला सामाजिक बांधिलकीची सुंदर जोड मिळाली असून, पोलिस हे समाजाचे रक्षणकर्ते आणि समाज हा पोलिसांचा आधार हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला.

---

## आजपर्यंत केलेल्या ज्ञानदानाचे फळ

### ज्ञानियात्री पुरस्काराने प्राप्त झालेले रवींद्र पवार सर विकास घागरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील मगरवाडी सारख्या शिक्षणाचा गंध नसलेल्या आणि संपूर्ण गाव फक्त कष्ट आणि कष्ट करण्यात काळी आईची सेवा करुन उदरनिर्वाह करणारे हे गाव या गावातील शिक्षणप्रेमी श्री दर्लिंग विद्या मंदीर चे अध्यक्ष एकनाथ पवार सर याच्या मार्गदर्शन आणि सहकार्याने य़ा विद्या मंदीर मध्ये ज्ञानदानाचे कार्य करणारे शिक्षक रविद्र पवार सर आणि विकास घागरे याना त्यानी आज पर्यत विद्यार्थाना केलेल्या ज्ञानदानाचे फळ ज्ञानयात्री हा पुरस्कार गोपाळपूरच्या खडकाळ माळावर बहुजनाच्या मुलासाठी उच्च अभियात्रिकी शिक्षण मिळावे ही शेतकर्याची मुले, मुली मोठी व्हावी.आणि देश उभारणीचे कार्य करावे या उद्देशानी या ठिकाणी स्वेरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.पी. रोंगे सर.यानी शिक्षण संस्था उभी केली.

या स्वेरी शिक्षण संस्थेच्या वतीने राज्यातील तसेच आपल्या जिल्ह्यातील शिक्षणक्षेत्रात ज्ञानदान करणार्या शिक्षकाना ज्ञानयात्री पुरस्कार देऊन प्रोत्साहित करण्याच्या तसेच या शिक्षकानी आजपर्यत केलेल्या कार्याचा यथोचित गौरव करण्याच्या उद्देशाने या कार्यकर्माचे आयोजन केले आहे.या कार्यक्रमा दरम्यान हा पुरस्कार देण्यात आला.

दर्लिग विद्यामंदीर चे शिक्षक रविद्र पवार,विकास घागरे याचे सर्वत्र कौतुक होत आहे. हे ज्ञान यात्री पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर रवींद्र पवार सर तसेच विकास घागरे यांनी आपल्या मुलाखतीमध्ये आपले मनोगत व्यक्त करत असताना ते म्हणाले आजपर्यंत केलेल्या ज्ञानदानाचे फळ ज्ञान यात्री पुरस्काराने प्राप्त झाले

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून पंढरपूर मंगळवेढा आमदार समाधान दादा अवताडे यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमास मुख्याध्यापक सुभाष माने सर तसेच माढा तालुक्याचे आमदार अभिजीत आबा पाटील, मुख्याध्यापक गुंड सर हे उपस्थित होते.